“ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील महिलांच्या सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास” : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वाणिज्य शाखेतील वाणिज्य विषयात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरीता संशोधन पूर्व सादर केलेला शोध सारांश

संशोधक

अंकिता राजकुमार नरवाडे

(एम. कॉम)

सांगवी ता. नांदेड जि. नांदेड

ईमेल- ankitanarwade1998@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

डॉ. एन. एच. आवडे

(सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक)

वाणिज्य विभाग,

ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, वसंतनगर

कोटग्याळ ता. मुखेड जि. नांदेड

संशोधन केंद्र
पीपल्स महाविद्यालय, नांदेड
ता. नांदेड जि. नांदेड

“ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील महिलांच्या सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास” : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

प्रस्तावना :

महिला स्वयंसहाय्यता गटाला सामाजिक व आर्थिक विकासात अत्यंत महत्त्वाचे असे स्थान प्राप्त झाले आहे. बचत गट ही एक योजना नसुन ग्रामीण भागातील महिलांच्या प्रगतीसाठी तयार केलेली एक संकल्पना आहे. त्यातून महिलांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व मानसिक विकास कसा होईल असा दृष्टिकोन समोर ठेवण्यात आला आहे. त्याच बरोबर महिलांच्या कुटूंबाला आर्थिक मदत होत आहे. गरीब लोकांची सावकारापासुन मुक्तता करणे, काटकसर करण्याची, बचतीची सवय लावणे ही कार्ये पुर्ण केली जात आहेत. या कार्यामागील महत्त्वाचा उद्‌देश म्हणून महिला व त्यांचे कुटूंब स्वावलंबी होऊन त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होत आहे. आत्मविश्वास वाढल्यामुळे त्यांची समाजात प्रतिष्ठा निर्माण होण्यास मदत होत आहे. तसेच त्यांच्यात एकमेकांबद्‌दल आदर व सहकार्याची भावना वाढीस लागली आहे.

महिला समस्यांचे मूळ आर्थिक असल्याने त्या समस्यांचे उच्चाटन करून आर्थिक सुबत्ता प्राप्त झाली तर महिलांना दर्जा व स्थान प्राप्त होईल. ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनवून महिलांना मानसन्मान देण्यासाठी रोजगाराचे नवे दालन म्हणून स्वयंसहाय्यता बचत गटाचा प्रारंभ झाला आहे. ग्रामीण भागातील त्यामुळे महिलांचे आर्थिक व सामाजिक परिवर्तन होत असून सर्व योजना अर्थ व्यवस्थेत नवी विचार प्रणाली, नवी व्यवस्था घडविण्यात स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

स्वयंसहाय्यता गटामुळे महिला स्वावलंबी बनून त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यास त्या सक्षम बनत आहेत. त्यांच्या या गरजा दैनंदिन किंवा उपभोग्य स्वरुपाच्या असतील जसे- वैद्यकिय खर्च, सणावारांकरिता होणारा खर्च, लग्न समारंभासाठी लागणारा खर्च तसेच बी- बीयाणे, खते, किटकनाशके, औषधी खरेदी करणे, दुभती जनावरे खरेदी करणे, शेळया मेंढया खरेदी करणे, लहान-लहान स्वरुपाचे व्यवसाय जसे हस्तकला व कुटीर उद्योग सुरु करणे इ. स्वरुपाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी 'स्वयंसहाय्यता गट' हे त्यांच्या गटातील सदस्यांना मदत करतात. महिलांच्या विकासाठी बचतगट एक वरदान ठरत असून स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या आत्मशक्तीचा विकास होत असुन अडथळे दूर करुन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी महिला स्वयंसहाय्यता गट सक्षमपणे कार्य करीत आहे. छोटया

छोटया बचतीतून मोठी रक्कम बचत करुन या महिला कुटुंबाला, समाजाला व देशाला सामर्थ्यवान बनवत आहेत.

समाजातील सर्वच तळागाळातील गरीब कष्टकरी महिलांना कुटूंबातील उत्पन्न कमी, खर्च जास्त यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असे. परंतू स्वयंसहाय्यगटामुळे आज याच महिला छोटी-छोटी रक्कम बचत करुन एकत्रित करण्यात आलेल्या सामुहिक निधीचा वापर आपल्या गटातील सर्व सदस्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी मदत करीत आहेत.

'स्वयंसहाय्यता ही सर्वोत्तम सहाय्यता आहे ' बचत गट म्हणजे संघटन, 'संघटन' ही एक शक्ती आहे. म्हणून स्वयंसहाय्यता गटात 'संघटीत होंगे तो खड़े होंगे, विघटित होंगे तो गिर पड़ोगे' असे म्हटले जाते. अशा छोट्या-छोट्या स्वयंसहाय्यता बचत गटाच्या उभारणीसाठी महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांना मदत केली जात आहे.

स्वयंसहाय्यता गटामुळे ग्रामीण भागातील महिलांचा आत्मविश्वास वाढत आहे. त्यामुळे त्या अधिक आत्मविश्वासाने समाजात वावरत आहेत. घराबाहेरील कामात निर्णयात सहभागी होत आहेत. महिलांना संधी मिळाल्यामुळे त्या उद्योजकतेकडे वळल्या आहेत. परिणामतः फक्त त्यांचा वैयक्तिक विकास न होता त्या गावाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत करीत आहेत. आपले निर्णय स्वतः राबवित आहेत. समाजात स्त्री पुरुष समानता येण्यास मदत होत आहे. गावातील पाणी, आरोग्य, रस्ते, वीज इत्यादी संदर्भातील समस्यांचे निराकरणही होत आहे. व्यसनमुक्ती कार्यातही त्या

सक्रियपणे सहभागी होत आहेत. गावातील व्यवस्था सुधारणे, सबल, सुदृढ राजकारण करून ग्रामविकासाची अनेक कार्य हाती घेऊन त्या गावाचा, समाजाचा, देशाच्या विकासात मदत करीत आहेत.

स्वयंसहाय्यता गटाची संकल्पना :

स्वयंसहाय्यता बचत गटाची मुळ संकल्पना बांगलादेशाची असून नोबेले विजेते डॉ. म. युनुस यांनी सुक्ष्म वित्त स्वरुपात विकसित केली आहे. बांगलादेशातील जोब्रा गाव वर्षानुवर्षे सावकारी विळख्यात अडकले होते. या गावातील लोकांचे दारीद्रय दूर करण्यासाठी व त्यांना सावकाराच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी सुक्ष्म वित्त स्वरुपात सहाय्य करण्यात आले. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या एकत्रित समुहाला विनातारण विनाकारण या तत्वावर वित्तीय मदत करुन स्वरोजगार निर्माण केला आहे. त्यामुळे तेथील लोकांचे दारिद्रय निर्मुलन झाले आहे. डॉ. महमद युनुसच्या प्रेरणेतून भारतातही महिलांच्या सबलीकरणासाठी सर्व योजना एकत्रित स्वर्णजयंती स्वयंरोजगार या नावाने १ एप्रिल १९९९ पासून प्रारंभ झालेला आहे. परंतू भारतात १९४७ मध्ये अमरावती जिल्ह्यात काही सासु वसुनांनी एकत्र येवुन २५ पैसे बचतीने बचत गटाचा प्रारंभ केल्याचा उल्लेख आढळतो. तर तसेच १९७० च्या दरम्यान 'इलाबेन भट' यांनी 'महिला व सुक्ष्म वित्त' या विषयाची मांडणी सुरु केली होती.

महाराष्ट्रात १९९४ मध्ये आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या मदतीने महाराष्ट्र ग्रामीण

पतपुरवठा प्रकल्पाअंतर्गत प्रायोगिक तत्त्वावर स्वयंसहाय्यता बचत गट ४ जिल्हयात राबविण्यात आले त्यातून अपेक्षित यश साध्य झाल्यानंतर संपुर्ण महाराष्ट्रभर महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत ही योजना राबविण्यात येत आहे. तसेच स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करण्यास प्रारंभ झाला. पुणे जिल्हयात चैतन्य संस्था, अन्नपुर्णा महिला मंडळ, डी.आर.डी.ए. ग्रामीण महिला व बाल विकास मंडळ, यांच्या माध्यमातून बचत गट स्थापन करण्यात येत आहेत. स्वयंसहाय्यता गट संकल्पनेचा उगम जगात असलेल्या दारिद्रयातुन गरीब जनतेला वित्तीय पुरवठयाच्या वंचिततेतुन झाला.

बचत गट ही सिमित कल्पना, या कल्पनेत काही व्यक्ति एकत्र येऊन पैसे गोळा करणे व त्याचा गटातील सदस्यांना एकमेकांच्या मदतीसाठी विनियोग करणे. एवढाच सिमित अर्थ होता. 'स्वयंसहाय्यता गट' म्हणजे स्वतःच स्वतःला मदत करण्यासाठी उभारलेला गट होय. 'म्हणून ही अधिक विस्तृत संकल्पना झाली या संकल्पनेकडून अपेक्षाही वेगवेगळया आहेत. स्वयंसहाय्यता गटाची चळवळ, महिला बचतगट, समूह गट, शेजार गट, सुक्ष्म वित्त, स्वल्प वित्त समुह, स्वावलंबी बचत गट, या वेगवेगळया संकल्पनेतुन स्वयंसहाय्यता गट चळवळ जोमात सुरु आहे. स्वयंसहाय्यता गटाची व्याख्या करणे अवघड असले तरी काही महत्त्वाच्या व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

स्वयंसहाय्यता गटाची संकल्पना :

स्वयंसहाय्यता बचत गटाची मुळ संकल्पना बांगलादेशाची असून नोबेले विजेते डॉ. म. युनुस यांनी सुक्ष्म वित्त स्वरुपात विकसित केली आहे. बांगलादेशातील जोब्रा गाव वर्षानुवर्षे सावकारी विळख्यात अडकले होते. या गावातील लोकांचे दारीद्रय दूर करण्यासाठी व त्यांना सावकाराच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी सुक्ष्म वित्त स्वरुपात सहाय्य करण्यात आले. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या एकत्रित समुहाला विनातारण विनाकारण या तत्वावर वित्तीय मदत करुन स्वरोजगार निर्माण केला आहे. त्यामुळे तेथील लोकांचे दारिद्रय निर्मुलन झाले आहे. डॉ. महमद युनुसच्या प्रेरणेतून भारतातही महिलांच्या सबलीकरणासाठी सर्व योजना

अशा छोट्या-छोट्या स्वयंसहाय्यता बचत गटाच्या उभारणीसाठी महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांना मदत केली जात आहे. स्वयंसहाय्यता गटामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढत आहे. त्यामुळे त्या अधिक आत्मविश्वासाने समाजात वावरत आहेत. घराबाहेरील कामात निर्णयात सहभागी होत आहेत. महिलांना संधी मिळाल्यामुळे त्या उद्योजकतेकडे वळल्या आहेत. परिणामतः फक्त त्यांचा वैयक्तिक विकास न होता त्या गावाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत करीत आहेत. आपले निर्णय स्वतः राबवित आहेत. समाजात स्त्री पुरुष समानता येण्यास मदत होत आहे. गावातील पाणी, आरोग्य, रस्ते, वीज इत्यादी संदर्भातील समस्यांचे निराकरणही होत आहे. व्यसनमुक्ती कार्यातही त्या सक्रियपणे सहभागी होत आहेत. गावातील व्यवस्था सुधारणे, सबल, सुदृढ राजकारण

करून ग्रामविकासाची अनेक कार्य हाती घेऊन त्या गावाचा, समाजाचा, देशाच्या विकासात मदत करीत आहेत.

महिला स्वयंसहाय्यता गटातील महिला यशस्वी उद्योजक बनत असुन संघटित होऊन समाजाच्या गरजा पुर्ण करण्याचे कार्य करीत आहेत. त्या सामाजिक कार्यात सक्रीय सहभागी होत आहेत. समाजातील वाईट चालीरीती, वाईट प्रथा, अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती, जनजागृती, कुटुंबकल्याण, वृध्दाश्रम, ग्रामस्वच्छता अभियान इ. कार्य करुन सामाजिक विकास घडवून आणत आहेत. समाजातील शिक्षण, आरोग्य, बालविवाह, जलसंधारण, वृक्षारोपन, प्रदुषण पर्यावरण, इ. सारख्या अनेक समस्या सक्षमपणे सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दारुबंदी, अंधश्रध्दा निवारणासाठी संघटित होऊन आवाज उठवित आहेत. सावकाराकडून होणारे आर्थिक शोषण थांबविणे, गरीब व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे, ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे, महिलांना बँकिग व्यवहाराची माहिती करुन देणे, महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, मानसिक विकास घडवून आणण्यासाठी महिला स्वयंसहाय्यता गटाची अत्यंत आवश्यकता आहे.महिला स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला उद्योजकता विकास व प्रशिक्षण, बाजारपेठेचे नवे तंत्र शिक्षण, आरोग्य इ. विषयावरती प्रबोधन करण्यात येत असून यात स्वयंसहाय्यता चळवळीला यश मिळत आहे. म्हणून दिवसेंदिवस जगातील अनेक देशात या चळवळीचे महत्त्व वाढत आहे.

आज जागतिक स्पर्धेत आपल्या देशाच्या सर्वांगिण विकासासाठी व भारताला महासत्ता बनविण्यासाठी स्वयंसहाय्यता गट चळवळीची मोलाची मदत होईल. म्हणून महिला स्वयंसहाय्यता गट चळवळ ही मराठवाडयातील महिलांच्या विकासासाठी एक वरदान ठरणारी चळवळ आहे असे म्हणता येईल. स्वयंसहाय्य गटातील महिलांमध्ये सुरक्षितता, भविष्याचे नियोजन, बचतीची सवय, खरेदी स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य, जबाबदारी निभावणे, नेतृत्व, आत्मबळ, आत्मविश्वास इ. गुणांचा विकास होत आहे. ही चळवळ बचतीच्या राजमार्गावरुन समर्थ स्त्री शक्ती स्वयंपूर्णतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

स्वयंसहाय्यता बचत गटाची व्याख्या :

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या मते "नियमितपणे बचत करुन त्यातून आपल्या सध्याच्या आर्थिक गरजा भागविण्याच्या समुहास स्वयंसहाय्यता समुह असे म्हणतात.

मोहन वैद्य यांच्या मते 'संघटित महिलांची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकार्याने तयार झालेल्या गटांना स्वयंसहाय्यता गट अथवा बचत गट असे म्हणतात. यशदा (य. च. विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे) यांच्या मते 'स्वयंसहाय्यता गट म्हणजे निश्चित स्वरुपाचे सामुदायिक उद्दिष्ट घेऊन तयार केलेल्या लोकांची एक स्वयंसेवी संघटना होय.

स्वयंसहाय्यता बचत गट निर्मितीचे उद्देश :

- बचत गट स्थापन करण्यामागे खालील उद्देश असतात.
- नियमित बचतीची सवय लावणे.
- अडचणीच्या वेळी पैसे उपलब्ध होणे.
- गटाला आणि गटातील प्रत्येक सदस्याला सशक्त बनविणे.
- सदस्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
- सदस्यांची समाजात व कुटूंबात ओळख पटवणे.
- सदस्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे.
- सदस्यांचा जीवनस्तर विकसित करणे.
- बचत गटाच्या माध्यमातुन सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रमांना मदत करणे, चालना देणे, मार्गदर्शन करणे.माजात जागृती निर्माण करणे, वाईट चालीरिती, वाईट प्रथा, अंधश्रध्दा निवारणासाठी संघटितपणे आवाज उठविणे.
- स्थानिक तथा ग्रामीण स्तरावरील संस्थामध्ये सहभाग वाढविणे.
- सावकाराकडून होणारे आर्थिक शोषण थांबविणे.
- गरीबांच्या स्थिती विषयी समाजात, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे.
- समाजातील गरीब वर्गासाठी कर्जाची व्यवस्था सुलभतेने व्हावी. जेणेकरुन बेरोजगारांना रोजगार मिळेल.

संशोधन पद्धती :

संशोधन हा एक बौद्धिक किंवा शैक्षणिक व्यायाम आहे आणि तसा हा शब्द तांत्रिक अर्थाने वापरला जावा. क्लिफर्ड वूडीच्या संशोधनानुसार समस्या परिभाषित करणे आणि पुन्हा परिभाषित करणे, गृहीतके तयार करणे किंवा सुचवलेले परिणाम किंवा उपाय यांचा समावेश होतो; माहिती गोळा करणे, आयोजित करणे आणि मूल्यमापन करणे; निर्धार करणे आणि निष्कर्षापर्यंत पोहोचणे; आणि शेवटी तंतोतंत चाचणी करून निकाल आणि निष्कर्ष ते सूत्रीकरण गृहीत धरतात की नाही हे तपासण्यासाठी. एनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेसमध्ये डी. स्टेनर आणि एम. स्टीफन्सन यांनी संशोधनाची व्याख्या "ज्ञानापर्यंत पोहोचण्यासाठी, योग्य किंवा प्रमाणित करण्यासाठी किंवा सत्यापित करण्याच्या हेतूसाठी संकल्पना, गोष्टी किंवा चिन्हांचे फेरफार म्हणून केली आहे, मग ते ज्ञान सिद्धांताच्या उभारणीत किंवा त्यामध्ये मदत करते.

अशाप्रकारे, संशोधन हे त्याच्या प्रगतीच्या निर्मितीसाठी विद्यमान ज्ञाननिर्मितीमध्ये खरे योगदान आहे. संशोधन, प्रयोग, तुलना आणि निरीक्षणाच्या साहाय्याने सत्याचा शोध घेणे आहे. थोडक्यात, एखाद्या समस्येवर परिणाम आणि उपाय शोधण्यासाठी वस्तुनिष्ठ आणि योग्य पद्धतशीर पद्धतीने माहितीचा शोध म्हणजे संशोधन. पद्धतशीर दृष्टिकोन प्रीपोझिशन सामान्यीकरण आणि सिद्धांत तयार करणे हे देखील संशोधन आहे. अशाप्रकारे 'संशोधन' हा शब्द समस्या मांडणे, एक गृहितक तयार करणे, माहिती किंवा डेटा गोळा करणे, तथ्यांचे विश्लेषण करणे आणि संबंधित

समस्येच्या निराकरणाच्या स्वरूपात किंवा विशिष्ट सामान्यीकरणाच्या स्वरूपात योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचणे अशा पद्धतशीर पद्धतीचा संदर्भ देते.

संशोधन समस्येचे विधान:

" ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील महिलांच्या सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास " : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

संशोधनाची गरज :

अलिकडील काळात, सुधारणा आणि सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण भागातील महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी बचत गट महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलाच्या सबलीकरणात महिला बतच गटाची भूमिका काय आहे ? याचा अभ्यास करण्याची गरज आहे तसेच ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या महिला बचत गटांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे वर्णन करण्यासाठी, भागातील अनुसूचित जातीच्या महिला बचत गटांच्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्या आणि अडचणीचा अभ्यास करण्यासठी आणि बचत गटांच्या कर्ज स्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधीकीने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

संशोधनाचे महत्त्व :

१. स्वतःला भेडसावणाऱ्या समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी सध्याचे संशोधन महत्त्वपूर्ण आहे

मदत गट महिला.

२. ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या महिलांच्या सहभागाचे विश्लेषण करण्यासाठी प्रस्तुत अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.

३. बचत गटांमधील परस्परसंबंध शोधण्यासाठी सध्याचे संशोधन महत्त्वपूर्ण आहे.

४. बचत गटांमधील सदस्यांचा स्वयंरोजगार आणि त्यांच्या जीवनातील आर्थिक सुधारणा यांच्यातील परस्परसंबंध शोधण्यासाठी सध्याचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.

५. सध्याचे संशोधन स्वयंमदत कर्जाच्या स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

६. सध्याचे संशोधन स्वयंसहायता गटांच्या महिलांनी निराकरण करण्यासाठी पुढाकार घेण्यास महत्त्वपूर्ण आहे.

७. बचत गटांच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या महिलांचा आर्थिक, सामाजिक विकास आणि त्यांच्या स्वतःच्या आणि कौटुंबिक समस्या चा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

संशोधनाचे उद्‌दिष्ट :

अभ्यासाची उद्‌दिष्टे ठरवण्याआधी, संशोधकाने संबंधित विषयावरील बरेच साहित्य पाहिले आहे आणि जगभरातील अशाच प्रकारे यापूर्वी केलेल्या विविध अभ्यासांचे परीक्षण केले आहे, संशोधन करण्यासाठी उद्‌दिष्टे. विविध साहित्याचे पुनरावलोकन करताना आढळून आलेले अंतर लक्षात घेऊन, संशोधनाची उद्‌दिष्टे आखण्यात आली

आहेत. संशोधन अभ्यासाच्या मुख्य विषयावर आधारित अभ्यास करण्यासाठी संशोधनाची विशिष्ट उद्दिष्टे खाली नमूद केली आहेत. प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित केली गेली आहेत :

१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांच्या बचत गटांचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांच्या सर्वांगीण विकासाचा अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांचे सक्षमीकरण व गाव विकासाच्या कार्यातील सहभागाचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण महिला बचत गटातील MSRLM कडून दिल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास करणे.

५) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांना दिल्या गेलेल्या कर्जाचा व परतफेडीचा अभ्यास करणे.

६) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांना बचत गट चालातांना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोनाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांचा आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थर बचत गटांच्या साह्याने उंचावतो व बेरोजगारीचे प्रमाण कमी होते.

२) नांदेड जिल्हयातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांचे संघटन घडून कुटुंब, गाव व पर्यायाने राष्ट्राचा विकास होण्यास मदत होत आहे.

३) नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या महिला बचतगट चालवताना अडचणीना समोर जातात.

संशोधन पद्धती :

MSRLM अंतर्गत नांदेड जिल्हयातील बचत गटांच्या सामाजिक आर्थिक स्थितीच्या विश्लेषणाविषयी प्रश्नांमध्ये तथ्य शोधण्यासाठी फील्ड सर्वेक्षणाद्वारे हे पूर्णपणे वर्णनात्मक संशोधन आहे. वर्णनात्मक संशोधन निवडण्याचा मूळ उद्देश म्हणजे ग्रामीण बचत गटांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे वर्णन करणे, बचत गटांच्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्या आणि अडचणी आणि बचत गटांच्या कर्ज स्थितीचा अभ्यास करणे. संशोधक संशोधनाच्या निष्कर्षांच्या आधारे बचत गटांबाबत तथ्ये मांडण्याचा प्रयत्न करतात.

तथ्य संकलनाचा स्रोत :

संशोधनाच्या उद्देशासाठी आवश्यक प्राथमिक तसेच दुय्यम माहितीच्या स्त्रोतांकडून गोळा केलीजाणार आहे.

१ . प्राथमिक स्त्रोत.

नांदेड जिल्हयातील विविध निवडक बचत गट आणि MSRLM जिल्हा कार्यालयात वैयक्तिकरित्या विखुरलेल्या प्रतिसादकर्त्यांकडून आवश्यक आणि आवश्यक माहिती गोळा करण्यात येणार आहे. उत्तरदात्याकडून प्राथमिक तथ्य गोळा करण्यासाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार केली जाईल आणि प्रतिसादकर्त्यांमध्ये वितरित करून त्यांच्या कडील अचूक माहिती निरीक्षण केले जाईल तसेच लहान मुलाखत, संवाद आणि संवादाद्वारे गोळा केलेली प्राथमिक माहिती देण्याची विनंती करण्यात येईल. अश्या प्रकारे प्राथमिक तथ्य गोळा केली जाईल .

२.दुय्यम स्त्रोत :

संशोधन कार्यासाठी आवश्यक माहिती तथ्य संकलनाच्या विविध दुय्यम स्त्रोतांकडून संकलित केली जाणार आहे जसे की संशोधन पेपर, संशोधन लेख, पुस्तके, संशोधन जर्नल्स, वर्तमानपत्रे, अहवालांचे सरकारी रेकॉर्ड, संबधित संशोधन साहित्याचा आढावा आणि त्याचा व्यापक वापर केला जाईल तसेच INFILIBNET सारख्या विविध वेब साइट्सचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन दृष्टीकोन :

प्रस्तुत संशोधन पूर्णपणे क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारित आहे. महाराष्ट्र राज्य उपजीविका अभियानांतर्गत नांदेड जिल्हयातील निवडक बचत गटांकडून सर्वेक्षण केले जाते. या सर्वेक्षणासाठी MSRLM अंतर्गत नांदेड जिल्हयातील निवडक भागांना भेट दिलेल्या बचत गटांच्या महिला विशेषत: संशोधकांवर प्रतिसाद देण्यात येईल.

संशोधन तथ्य संकलनाची साधने :

१. उत्तरदात्यांकडून आवश्यक माहिती मिळवण्यासाठी बचत गटाच्या महिलांशी चर्चा करण्यात येईल व योग्य प्रश्नावली तयार करुन तथ्य संकलीत करण्यात येईल.

२. मुलाखत पद्धत तसेच टेलिफोनिक पद्धत देखील वापर करण्यात येईल .

३. प्रथमदर्शनी माहिती मिळविण्यासाठी निरीक्षण पद्धत देखील वापर करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती :

- संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातील बचत गटातील अनुसूचित जातीतील ग्रामीण महिलांचा समावेश आहे.
- संशोधन अभ्यास हा नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील ग्रामीण महिलाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करतो.
- संशोधन अभ्यास नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील ग्रामीण महिला पुढाकार घेण्याच्या विश्लेषणावर केंद्रित आहे.
- बचत गटांच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील ग्रामीण महिला स्वतःच्या आणि कौटुंबिक समस्या सोडवतात.

संशोधनाच्या मर्यादा :

१. प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील ग्रामीण महिला बचत गटातील महिलांपुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे स्वयंसहाय्याच्या सामाजिक आणि आर्थिक विकासापुरते मर्यादित आहे.

३. स्त्रियांच्या विश्लेषणाद्वारे संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील ग्रामीण महिला महिलांसाठी मर्यादित आहे.

४. स्वयंसहायता गटातील महिलांनी स्वतःच्या आणि कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेण्याचा परस्परसंबंध शोधून काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्रकरण योजना :

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : नांदेड जिल्ह्याचा आराखडा आणि बचत गट

प्रकरण तिसरे : संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण चौथे : अनुसूचित जातीतील महिलांच्या सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष आणि सूचना

संदर्भग्रंथ सूची :

१. ttps://southcampus.uok.edu.in/Files/Link/DownloadLink/RM.२०U१.२०P १.

२. नाबार्डचे हँडबुक. https://vikaspedia.in/social-welfare/rural-poverty-alleviation-१/self-help-groups/overview-of-shgs.

३. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशनचे हँडबुक tps://daynrlmbl.aajeevika.gov.in/Circulars/Handbook.२०on.२०SHG.pdf

४. https://maharashtra.gov.in/Site/Upload/Tenders/Marathi/FMTSC.pdf

५. http://www.helpo.org/helpo-projects/self-help-groups-bachat-gats/

६. https://niti.gov.in/planningcommission.gov.in/docs/reports/sereport/ser/ser _sh

g३००६.pdf

७. https://www.rajeshtimane.com/shg_in_rural_devt/ केले.

८. http://www.asrango.org/livelihood

९. https://www.rajeshtimane.com/shg_in_rural devt/

१०. https://www.rajeshtimane.com/shg in rural devt/

११.https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/१०६०३/१२५१८१/१२/१२ summary.pdf Assessed

१२.https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/१०६०३/१२५१८१/१०/१० chapter.४.pdf

१३.https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/१०६०३/२१८१४०/१४/१४-Chapter.२०७.pdf

१४. https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/१०६०३/१६५८१८/१६/१६ pdf

१५.https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/१०६०३/१६५८१८/१४/१४धडा ५.pdf

१६. www.worldwidejournals.com

१७.www.journalpressindia.com

विद्यार्थी
अंकिता राजकुमार नरवाडे

संशोधन मार्गदर्श
डॉ. नागोराव एच. आवडे

“ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील महिलांच्या सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास” : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

गोषवारा : भारतीय समाजातील महिला वर्ग हा नेहमीच उपेक्षीत राहिलेला घटक असून प्रत्येक धर्मात महिलांची अहवेलनाच झालेली आहे. समाजात महिलेला कधी ज्ञानाचे. शक्तीचे प्रतिक म्हणून पुजा केली जाते. तर तिला कधी देवी सरस्वती दुर्गा आणि लक्ष्मी म्हणून पुजा केली जाते. आजही समाजात महिला पुरुषाची खाजगी मालमत्ता आहे अशा विकृत मानसिकतेत वावरत असून पुरुष वर्ग महिलांना दासी, अबला आणि उपभोगाची वस्तू या दृष्टीकोनातून पाहिल्या जाते.

भारतीय महिलांच्या आयुष्यातील ‘अंधार युग’ म्हणून उत्तर वैदिक काळ समजला जातो. या काळातच धर्मशास्त्राचे युग सुरु झाले. ‘मनुस्मृती’ हा हिंदू धर्माचा सामाजिक कायदा म्हणून समाज पालन करु लागला. उत्तर वैदिक काळात अंधश्रद्धा, आणि कर्मकांडाला खऱ्या अर्थाने रुजविण्यास सुरुवात झाली. त्यामुळे समाजात वाईट रुढी, वाईट परंपरांना सुरुवात झाली. समाजात सती प्रथा, बालविवाह, बहुपत्नी पद्धत पुनः विवाला विरोध, हुंडा पद्धत, अशा वाईट प्रथा समाजात रुढ झाल्या. त्यामुळे कुटूंबातील पत्नी ही पतीकडे (पती परमेश्वर) ईश्वराच्या नजरेतून पाहू लागली. खऱ्या अर्थाने या काळात महिलांची प्रतिष्ठा व सामाजिक स्थान दुय्यम होण्यास सुरुवात झाली.

जगात ‘बचत’ ही संकल्पना तशी नवीन नसून जगात फंड, भिसी अशा वेगवेगळ्या स्वरुपात बचत चालू होती. दक्षिण अमेरिका व आफ्रिका भागात (Rotation Saving and Credit Association) हा बचतीचा प्रकार भिशी सारखाच संबंधीत होता भारतात समूह उद्योगाची संकल्पना तशी नविन नसून महाराष्ट्रात बाळासाहेब विखे पाटील यांनी आशियातील पहिला सहकारी तत्त्वावर सहकारी साखर कारखाना निर्माण केला. महाराष्ट्रात आजही सहकारी तत्तवावर प्रत्येक जिल्ह्यात विविध नावाने खाजगी बँका कार्यरत असून सहकारी चळवळीचा मुख्य उद्देश हा ग्रामीण व शहरी भागातील खाजगी सावकार शाहीतून सामान्य माणसाची सुटका करणे हा आहे.

जगात बचत गटाचा पहिला प्रयोग बांगला देशात झाला. 'बांगलादेशातील चित्तगाव विद्यापीठातील प्रो. महमंद युनूस यांनी सुरु केला. बांगला देशाची राजधानी ढाका शहरातील चित्तगाव विद्यापीठाजवळ 'जोबा' या गावाची गरीब व भूमीहिनांचे गाव म्हणून ओळख होती. परंतू ते आज बचत गटाचे जन्मगाव म्हणून साऱ्या जगाला परिचित झाले आहे. १९७६ साली ४२ कुटुंबांना २७ डॉलरचे अर्थसहाय्य उपलब्ध करुन सुरु झालेला हा प्रवास १९९८ साली २३ लाख कुटुंबीयांना २०.३ कोटी डॉलर्सचा कर्जपुरवठा करण्यापर्यंत जावून पोचला आहे.

नांदेड जिल्ह्यात मागासवर्गीय महिलांची आर्थिक स्थिती गंभीर असून बचत गटात ७० ते ८० टक्के मागासवर्गीय महिला बचत गटात आहेत. बचत गटाच्या माध्यमतान समूह उद्योग व्यवसाय, घरेलू उद्योग-व्यवसाय सुरु केले आहेत. नांदेड जिल्हा हा

उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने पिछाडीवर आहे. महिलांना बारा महिने रोजगार पुरवणारे उद्योग, व्यवसाय जिल्हयात नाहीत म्हणून बचत गट मागासवर्गीय महिलांना उद्योग व्यवसाय करण्यास यशस्वी ठरले आहे.

संशोधन विषयाचे महत्व :- "ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील महिलांच्या सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास" : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा असा संशोधन विषय असून बचत गटात काम करणाऱ्या अनुसूचित जातीतील महिलांच्या सामाजिक,आर्थिक सबलीकरणाचे अध्ययन करण्याची आवश्यकता असून अनुसूचित जातीतील महिला सक्षमीकरणाला बचत गटाची चळवळ कशी पुरक आहे. याचा आढावा घेतला जाणार आहे. बचत गटात काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील महिलांची आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणाची स्थिती जाणून घेण्यासाठी हे अध्ययन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट : १) नांदेड जिल्हयातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांच्या बचत गटांचा अभ्यास करणे. २) नांदेड जिल्हयातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांच्या सर्वांगीण विकासाचा अभ्यास करणे.३) नांदेड जिल्हयातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांचे सक्षमीकरण व गाव विकासाच्या कार्यातील सहभागाचा अभ्यास करणे.४) नांदेड जिल्हयातील ग्रामीण महिला बचत गटातील MSRLM कडून दिल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास करणे.५) नांदेड जिल्हयातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांना दिल्या गेलेल्या कर्जाचा व परतफेडीचा अभ्यास करणे.६) नांदेड जिल्हयातील

ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांना बचत गट चालातांना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोनाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके : १) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांचा आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थर बचत गटांच्या साह्याने उंचावतो व बेरोजगारीचे प्रमाण कमी होते.२) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जातीच्या महिलांचे संघटन घडून कुटुंब, गाव व पर्यायाने राष्ट्राचा विकास होण्यास मदत होत आहे. ३) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या महिला बचतगट चालवताना अडचणीना समोर जातात.